**दिनांक : २२ जून २०२३**

**विषय : दिनांक २१-६-२३ चा  पुनर्निर्माण संबंधी झालेला मेळावा.**

दिनांक २१-६-२३ रोजी संस्थे च्या पुनर्निर्माण प्रकल्पा - अंतर्गत आपल्या कन्सल्टंट चे शॉर्ट लिस्ट केलेल्या तीन बिल्डर्स च्या फायनल ऑफर्स चे तुलनात्मक PPT सादरीकरण संस्थे च्या मधुकर जोशी सभागृहात करण्यात आले. ह्या मेळाव्याला संस्थे चे १०१ सभासद् आणि कुटुंबीय उपस्थित होते.

संस्थे चे सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी उपस्थितांचे स्वागत करून दिनांक २५-६-२४ ला होणाऱ्या एका विकासकाची निवडी साठी होणाऱ्या तिन्ही विकासकांचे सादरीकरण आणि त्या साठी होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभे च्या आधी आज चे सादरीकरण कसे महत्वाचे आहे ते सांगून आपले सल्लागार श्री कवडिकर आणि अड. श्रीमती काबरा यांना त्याचे सादरीकरण करण्यास पाचारण केले.

श्री कवडिकर आणि अड. काबरा यांनी तिन्ही बिल्डर्स ला पाठवलेल्या आपल्या टर्म्स आणि कंडिशन्स तसेच त्यांनी दिलेल्या फायनल ऑफर्स चे पॉइंट वाईज विश्लेषण केले. कुठला बिल्डर आपल्याला एकूण किती वाढीव चटई क्षेत्र देण्याची ऑफर देत आहे हे समजावून सांगितले. तिन्ही बिल्डर्स ची रेरा तपासणी आणि आर्थिक क्षमता पडताळून बघितल्याचे ही तसेच तिन्ही बिल्डर्स आपला प्रकल्प पूर्ण करण्यात समर्थ असल्याचे सांगितले.

ॲड. काबरा यांनी २५ तारखेला होणाऱ्या सादरीकरण आणि त्या नंतर होणाऱ्या गुप्त मतदाना बद्दल सविस्तर माहिती दिली.

शेवटी दोघा सल्लागारांनी सभासदांच्या प्रश्नांना उत्तरं देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले.

मेळावा च्या शेवटी संस्थे चे अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी सल्लागार आणि उपस्थितांचे आभार मानून २५ तारखे ला सभासदांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहून एक विकसक, त्यांच्या आवडी प्रमाणे, निवडावा असे आव्हान करून सभा संपल्याचे जाहिर केले.

प्रदीप नेवाळकर

पंच समिती साठी